



दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

vadalvartanews@gmail.com






●मुख्य संपादक : अजय भांगे ●कार्यकारी संपादक : रमेश गुळभिले https://epaper.vadalvarta.com मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● शनिवार १७ ऑगस्ट २०२४ ● आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ ● वर्ष २ ले ● अंक २ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# नाशिक नंतर आता छत्रपती संभाजीनगरमध्ये तणाव !




### महंत रामगिरी महाराजांची वादग्रस्त वक्तव्यावर प्रतिक्रिया काय?

छत्रपती संभाजीनगरमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाल्यानंतर महंत रामगिरी महाराज यांनी त्यांच्या वादग्रस्त वक्तव्यावर प्रतिक्रिया दिली आहे. "बांगलादेशात जो प्रकार घडला, आज कोट्यवधी हिंदूंवर अत्याचार सुरु आहे. आमच्याकडे एक बातमी तर अशी आली की, बांगलादेशात एका महिलेवर तब्बल 30 जणांनी बलात्कार केला. कोटी-दीड कोटी लोक भारताच्या सीमेवर उभे आहेत की, आम्हाला भारतात आश्रय द्या. त्यामुळे आम्ही प्रतिक्रिया देताना सांगितलं की, हिंदूंनी सुद्धा मजबूत राहायला हवं. बांगलादेशात जे घडलं ते उद्या आपल्या इथे घडायला नको. अन्याय करणारा जसा अपराधी असतो तसा सहन करणारा देखील अपराधी असतो. त्यामुळे आपण अन्यायाला प्रतिकार केला पाहिजे", असं महंत रामगिरी महाराज म्हणाले. "आपला धर्म आणि संस्कृती शांततेच्या मार्गाने चालले आहेत. पण कुणी शांतता भंग करण्याचा प्रयत्न केला तर अशावेळेला आपण सुद्धा प्रत्युत्तर देण्याची तयारी ठेवावी, या दृष्टीकोनातून आम्ही जे काही बोललो ते बोललो आहोत. आमचा उद्देश हाच आहे, हिंदूंनी मजबूत आणि संघटित राहावं. असंघटितपणामुळे आजपर्यंत फायदा घेतला गेलाय. जे असेल ते असेल. गुन्हा दाखल झाला असेल नोटीस येईल तेव्हा बघू", अशी प्रतिक्रिया महंत रामगिरी महाराज यांनी दिली.

**नाशिक । सुरेश इंगळे**

नाशिकच्या भद्रकाली परिसरातील तणावानंतर आता छत्रपती संभाजीनगर शहरातही तणावाची परिस्थिती असल्याची माहिती समोर येत आहे. पण या दोन्ही घटना वेगवेगळ्या आहेत. नाशिकमध्ये सकल हिंदू समाजाकडून आज नाशिक बंदची हाक देण्यात आली होती. बांगलादेशात हिंदूंवर झालेल्या अत्याराच्या निषेधार्थ सकल हिंदू समाजाकडून आज नाशिक शहर बंदची हाक देण्यात आली होती. तसेच सकल हिंदू समाजाची रॅली जिल्हाधिकारी कार्यालयावर निघाली होती. यावेळी भद्रकाली परिसरात दुकानं बंद करण्याच्या मुद्द्यावरुन दोन गटात वाद झाला. पण पोलिसांनी परिस्थितीचं गांभीर्य ओळख मोठा बंदोबस्त परिसरात तैनात केली. पोलिसांनी परिस्थितीवर नियंत्रणात आणली. यानंतर आता छत्रपती संभाजीनगर शहरात तणाव निर्माण झाल्याची माहिती समोर येत आहे. छत्रपती संभाजीनगरमधील सीटी चौक पोलीस ठाण्याबाहेर मोठा जमाव जमला आहे. महंत रामगिरी महाराज यांनी केलेल्या वक्तव्यावरुन संभाजीनगरमध्ये तणावाची परिस्थिती निर्माण झाली. महंत रामगिरी महाराज यांनी वादग्रस्त वक्तव्य केल्यामुळे पोलीस ठाण्याबाहेर मोठी गर्दी निर्माण झाली. महंत रामगिरी महाराजांना अटक करण्यात यावी. त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी घेऊन जमाव सीटी चौक पोलीस ठाण्याबाहेर दाखल झाला. यावेळी पोलिसांनी आंदोलकांची मनधरणी करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे परिस्थिती आता नियंत्रणात आली आहे. आंदोलकांकडून पोलीस ठाण्याबाहेर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. महंत रामगिरी महाराजांना अटक करण्यात यावी, अशी मागणी आंदोलकांकडून केली जात आहे. आंदोलक उभ्या असलेल्या पोलीस ठाण्याबाहेर मोठी मार्केट आहे. या मार्केटमध्ये कडकडीत बंद पाळण्यात आला आहे. मार्केटमधील सर्व दुकाने बंद आहेत. सध्या परिस्थिती नियंत्रणात आहे. संपूर्ण शहरात एसआरपी पोलीस पथक आणि महाराष्ट्र पोलीस दलातील पोलीस कर्मचारी तैनात आहेत. पोलिसांकडून परिस्थितीत नियंत्रणात राहण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न केले जात आहेत. दरम्यान, महंत रामगिरी महाराज यांच्याविरोधात वैजापूर आणि येवल्यात गुन्हा दाखल झाला आहे. "हिंदूंच्या असंघटीतपणा फायदा घेतला गेलाय. जेव्हा नोटीस येईल तेव्हा बघू", असं रामगिरी महाराज म्हणाले आहेत. दुसरीकडे छत्रपती संभाजीनगरमध्ये असलेल्या जमावाच्या शिष्टमंडळाने पोलिसांना निवेदन दिलं आहे. महंत रामगिरी महाराज यांनी केलेल्या वादग्रस्त वक्तव्यामुळे राज्यातील विविध ठिकाणी निषेध व्यक्त केला जातोय.



# शिक्षणाचा अधिकार : एक मुलभत अधिकार-प्रा.शशिकांत जावळे

**शिरूर कासार।प्रतिनिधी**

अनु.जाती व नवबौद्ध (मुलांची) शासकीय निवासी शाळा शिरुर कासार येथे संविधान : "शिक्षण व आरक्षण " या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा.शशिकांत जावळे यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या श्रीमती अस्मिता जावळे मॅडम यांनी भूषविले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत भारतीय स्वातंत्र्य महोत्सव निमित्त संविधान मंच स्थापन करण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने शासकीय निवास मुलांची शाळा येथे सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय संविधान यांचे पूजन करून करण्यात आली .भारतीय संविधानामध्ये शिक्षण व आरक्षण तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना का आवश्यकता वाटली , त्याबद्दलचे विश्लेषण उदाहरणांसह प्रा. शशिकांत जावळे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख असणे गरजेचे आहे असे विशद केले पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आरक्षणाविषयी असणारा संभ्रम विविध उदाहरणे देऊन दूर केला. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना उच्च शिक्षण व परदेशात जागतिक दर्जाचे शिक्षण घेतले पाहिजे यासाठी इंग्रजी विषया वर आपले प्रभुत्व असले पाहिजे. कारण जागतिक स्तरावर इंग्रजी भाषेला मान्यता आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समरूप मध्ये प्राचार्य श्रीमती अस्मिता मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी मौक्याच्या वनाच्या जागा काबीज करावी त्यासाठी त्यांना भारत सरकार सामाजिक न्याय विभागाच्या विविध असणाऱ्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील फंद सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री वाघमारे सर यांनी मानले . या कार्यक्रमासाठी विचार मंचावर श्री जगताप सर , श्री सिरसाट सर आदी उपस्थित होते . या कार्यक्रमासाठी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# नाथ कनिष्ठ महाविद्यालय, नाथापुर येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार आणि स्वातंत्र्यदिन साजरा

**परळी वैजनाथ । प्रतिनिधी**

नाथापूर येथील नाथ कनिष्ठ महाविद्यालय मध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थेचे अध्यक्ष मदनराव चव्हाण भाऊ यांच्या हस्ते ध्वजारोहण पार पडले. यावेळी नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य श्री. गोविंद चव्हाण सर, नाथ हायस्कूल मुख्याध्यापक धूरवडे सर आणि साईनाथ मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री अशोक चव्हाण सर , सर्व शिक्षकवृंद आणि कर्मचारी उपस्थित होते. यावेळी गेल्या शैक्षणिक वर्षांमध्ये कला आणि विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी तसेच वैद्यकीय शिक्षणास पात्र झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ आणि भारताचा स्वातंत्र्य



दिन मोठ्या उत्साहात पार पडला यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष माननीय श्री मदनराव भाऊ चव्हाण हे होते. यावेळी विज्ञान शाखेतून सर्वप्रथम आलेल्या दुबाले संस्कार अनिरुद्ध, सर्वद्वितीय गिराम प्रतीक्षा महादेव, सर्वतृतीय गिराम रेवती जगन्नाथ तसेच कला शाखेतील सर्वप्रथम आलेल्या काळे मयुरी रमेश, सर्वद्वितीय त्रिभुवन मयुरी ज्ञानदेव आणि सर्व तृतीय आलेल्या दोन विद्यार्थिनी वरवडे दीक्षा भाऊराव आणि काळे प्रतीक्षा श्रीकृष्ण सर्व विद्यार्थ्यांना महाविद्यालयातर्फे स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन यांचा सत्कार करण्यात आला. याचवेळी वैद्यकीय शिक्षणास पात्र ठरलेल्या तीन विद्यार्थ्यांचा देखील महाविद्यालयामार्फत सत्कार करण्यात आला. यामध्ये कु. घुमरे प्राजक्ता संजय, शेख नोमान निसार आणि रहाडे ऋषिकेश उद्धव या विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह, शाल, श्रीफळ आणि पुष्पहार देऊन संस्थेचे अध्यक्ष मदनराव चव्हाण भाऊ व महाविद्यालयाचे प्राचार्य श्री चव्हाण सर यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी नाथ कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री गिराम सर यांनी महाविद्यालयाच्या गतवर्षातील शैक्षणिक कामकाजाचा थोडक्यात आढावा आणि महाविद्यालयाची भविष्यातील वाटचाल यावरती मनोदय व्यक्त करून सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी ध्वजारोहण आणि सत्कार समारंभास नाथापूर गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

## सम्राट आशोक गायकवाड याची जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत निवड




**केज । सचिन भालेराव**

केज शहरातील फुलेनगर येथील सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांचा मुलगा चि. सम्राट अशोक गायकवाड याची जिल्हास्तरीय बुद्धीबळ स्पर्धेत निवड झाली आहे. या बाबत वृत असे कि गटशिक्षण कार्यालय केज तसेच तालुका परिषद केज यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते त्यामध्ये विविध प्रकारच्या अनेक खेळांचे आयोजन केले असता बुध्दीबळ स्पर्धेमध्ये मॉडेल इंग्लिश स्कूल केजचा विद्यार्थी तथा सामाजिक कार्यकर्ते अशोक गायकवाड यांचा मुलगा चि. सम्राट अशोक गायकवाड याने यशाची गवसनी घालत प्रथम क्रमांक मिळवून त्यांची जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. या त्याच्या यशाबद्दल सर्व स्तरातुन त्याचे अभिनंदन केले जात असुन जिल्हास्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

# संजय गांधी, श्रावण बाळ योजनेतील गेवराईतील सर्व प्रस्ताव मंजूर करावेत

## बदामराव पंडित यांची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**गेवराई।प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील संजय गांधी आणि श्रावण बाळ योजनेतील लाभार्थ्यांबाबत विरोधक स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी सूड बुद्धीने काम करत आहेत. गेवराई तहसील मध्ये दाखल असलेले सर्व प्रस्ताव रद्द करून पुन्हा नव्याने प्रस्ताव मागणीचे षडयंत्र करत आहेत. वास्तविक पाहता जे प्रस्ताव दाखल आहेत ते सर्व प्रस्ताव अगोदर मंजूर करावेत त्यानंतर नवीन प्रस्ताव स्वीकारावेत अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.

स्वातंत्र्यदिनी आपल्या निवासस्थानी पत्रकारांशी संवाद साधताना शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गेवराई तालुक्यातील विधवा, विकलांग, निराधार आणि गंभीर आजारी असलेल्या गरीब महिला व पुरुषांनी संजय गांधी आणि श्रावण बाळ या शासकीय योजनेतील लाभासाठी गेल्या कित्येक महिन्यापासून तहसील कार्यालयात प्रस्ताव दाखल केलेले आहेत. त्यापैकी अर्धे प्रस्ताव यापूर्वीच मंजूर झाले आहेत. मात्र जवळपास चार हजार प्रस्ताव मंजुरीच्या प्रतीक्षेत असताना, नुकतीच संजय गांधी निराधार समितीच्या पदाधिकाऱ्यांची नव्याने निवड करण्यात आली आहे. त्यामुळे जुने प्रस्ताव रद्द करून पुन्हा नव्याने प्रस्ताव मागणी करण्याचा प्रकार जाणीवपूर्वक स्वतःच्या राजकीय स्वार्थासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अमरसिंह पंडित व विजयसिंह पंडित हे दोघे भाऊ करण्याचा प्रयत्न करत आहेत. हे आम्ही कदापि होऊ देणार नाहीत. कारण यापूर्वीचे प्रस्ताव दाखल करताना गोरगरीब खऱ्या लाभार्थ्यांनी एक एक पैसा जमा करून कागदपत्र जमवत हे प्रस्ताव दिलेले आहेत. ती रद्द करून पुन्हा नव्याने दाखल करायचे असतील तर अगोदरच आर्थिक स्थिती नाजूक असलेल्या या लोकांवर डबल खर्च करण्याची वेळ येईल, ती त्यांना शक्य नाही. त्यामुळे गेवराई तहसील कार्यालयात दाखल असलेले सर्व प्रस्ताव अगोदर मंजूर करावेत आणि नंतर दुसरे प्रस्ताव स्वीकारावेत अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे आपण करणार असल्याचे शिवसेना नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी म्हटले आहे. याप्रसंगी पत्रकार बहुसंख्येने उपस्थित होते.

# रोहितळ राजमाता जिजाऊ विद्यालयात यशराज पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण

## शिक्षण घेऊन आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा-यशराज पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित राजमाता जिजाऊ विद्यालय रोहितळ या शाळेत स्वातंत्र्यदिनी युवा नेते यशराज पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

15 ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी राजमाता जिजाऊ विद्यालय रोहितळ शाळेत यशराज पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, युवा सेना तालुकाप्रमुख शेख शहेदाद, सरपंच मुकुंद बाबर, उपसरपंच अनिल माळी, पप्पू चव्हाण, माजी उपसरपंच पंडित गायकवाड, ग्रा पं सदस्य दामु



जीजा गोरे, श्रीहरी गोरे, विठ्ठल शिंदे, बाळासाहेब वाघमोडे, बाबासाहेब शिंदे, अमोल खरात, शाकीर शेख, भागवत पवार, किशोर ठोंबरे, ज्ञानेश्वर खरात, रमेश गायकवाड, परमेश्वर बाबर, विनोद गायकवाड, उज्वल सुतार, ओम माळवदे ज्ञानेश्वर राऊत भागवत गायकवाड, राजेंद्र ठोंबरे, आदींसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

विद्यार्थी व पालकांशी संवाद साधताना युवा नेते यशराज पंडित म्हणाले की ग्रामीण भागातील मुला मुलींना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांनी ग्रामीण भागात राजमाता जिजाऊ आणि अहिल्याबाई होळकर या नावाने शाळा सुरू केले आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय आपल्याच गावात झालेली आहे. याचा फायदा घेऊन मुला-मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे आणि आपल्या आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करावे. नोकरी सोबतच व्यावसायिक शिक्षण घेऊन वेगवेगळ्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्येही आपले नाव कमवावे असे आवाहन करून यशराज पंडित यांनी शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले. शाळेत शिक्षणासह क्रीडा स्पर्धा प्रबोधनात्मक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणित अध्यापक मंडळाचे तालुकाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले तर सरपंच मुकुंद बाबर, मुख्याध्यापक राजाभाऊ क्षीरसागर यांची समायोजित भाषणे झाली. सूत्रसंचालन गोविंद राऊत यांनी तर वसंत केदार यांनी आभार मानले.

दरम्यान बालाजी शिंदे, वसंत केदार व संगीता खराडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रपुरुष, आदर्श महिला व्यक्तिमत्व तसेच डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ आदींच्या वेशभूषा करून सवाद्य लेझीम पथकासह गावातून प्रभात फेरी काढली. यात केशरी साड्या आणि भगवे फेटे परिधान केलेल्या विद्यार्थिनींनी गावकऱ्यांचे लक्ष वेधले.

शाळेचे शिक्षक रेवननाथ वराट, आदिनाथ अर्सुळ, रेवन भोईटे, विठ्ठल चाळक, गव्हाणे मामा आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर विद्यालय आपेगाव येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा

## एस.एस.सी. २०२४ मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण



**पैठण । चैताली औटी**

संत ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी एस.एस.सी. परीक्षेत विद्यालयातुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येते.या वर्षी एस.एस.सी. परिक्षा मार्च २०२४ मध्ये विद्यालयातून प्रथम आलेली कु. गायत्री राम औटे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच पांडुरंग औटे, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील मुळे, पोलीस पाटील,डॉ. आरले, उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून आजादी का आमृत महोत्सव, स्वतंत्र भारत देशाविषयी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणाच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त केले.दहावी मध्ये प्रथम येणाऱ्यास सरपंच पांडुरंग दादा औटे यांच्या तर्फे पाच हजार एक रुपयाचे बक्षीसही देण्यात आले. यावेळी अनेक पालकांनी संत ज्ञानेश्वर विद्यालया बाबत बोलताना असे म्हटले की, संत ज्ञानेश्वर विद्यालय हे पैठण तालुक्यामध्ये सर्वोत्कृष्ट असे विद्यालय आहे असे म्हणुन विशेष कौतुक देखील केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु .श्रद्धा औटे व प्रांजली मोरे यांनी केले.यावेळी मुख्याध्यापक कल्याण म्हस्के, शाळेतील सहशिक्षक श्री नवथर कांतीलाल, काकासाहेब लिपाणे, विवेक भोसले ,प्रवीण पोकळे ,संभाजी चिरखे, प्रकाश पाटील ,संजय वल्ले, श्रीमती घनवट मॅडम ,महेश वैद्य, सतीश आंधळे दीपक लसगरे, गंगाधर शिंदे, ज्ञानेश्वर गायके व शिक्षकेतर कर्मचारी श्री राम एरंडे ,दादा सोनवणे, काका आहेर, रामनाथ पालकर आदी उपस्थित होते.

# शिक्षणाचा अधिकार : एक मुलभत अधिकार–प्रा.शशिकांत जावळे



शिरूर कासार ।प्रतिनिधीअनु.जाती व नवबौद्ध (मुलांची) शासकीय निवासी शाळा शिरुर कासार येथे संविधान : “शिक्षण व आरक्षण “ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. शशिकांत जावळे यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या श्रीमती अस्मिता जावळे मॅडम यांनी भूषविले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत भारतीय स्वातंत्र महोत्सव निमित्त संविधान मंच स्थापन करण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने शासकीय निवास मुलांची शाळा येथे सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय संविधान यांचे पूजन करून करण्यात आली .भारतीय संविधानामध्ये शिक्षण व आरक्षण तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना का आवश्यकता वाटली , त्याबद्दलचे विश्लेषण उदाहरणांसह प्रा. शशिकांत जावळे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख असणे गरजेचे आहे असे विशद केले पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आरक्षणाविषयी असणारा संभ्रम विविध उदाहरणे देऊन दूर केला. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना उच्च शिक्षण व परदेशात जागतिक दर्जाचे शिक्षण घेतले पाहिजे यासाठी इंग्रजी विषया वर आपले प्रभुत्व असले पाहिजे. कारण जागतिक स्तरावर इंग्रजी भाषेला मान्यता आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समरूप मध्ये प्राचार्य श्रीमती अस्मिता मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी मौक्याच्या वनाच्या जागा काबीज करावी त्यासाठी त्यांना भारत सरकार सामाजिक न्याय विभागाच्या विविध असणाऱ्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील फंद सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री वाघमारे सर यांनी मानले . या कार्यक्रमासाठी विचार मंचावर श्री जगताप सर , श्री सिरसाट सर आदी उपस्थित होते . या कार्यक्रमासाठी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीमध्ये भारतीय स्वातत्र्यं दिन उत्साहात साजरा करण्यात आला बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सभापती सौ.सरलाताई कामराज मुळे पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी उपसभापती श्यामभाऊ पडोळे,संचालक दिपक काळे,बळीराम चव्हाण,पंडित माने,पी वाय जोगदंड,सचिन फड,राधेश्यामजी कासट,शेतकरी पुत्र धनंजय गुंदेकर,वैभव मुळे पाटील,कृषी उत्तपन्न बाजार समितीचे सचिव यशवंत कदम साहेब व सर्व व्यापारी व मापाडी कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थीत होते.

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांना काळा झेंडा दाखवून माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी निषेध नोंदवला

**बीड । प्रतिनिधी**

माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी पालकमंत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केला काळा झेंडा दाखवून निषेध नोंदवला आहे तीन वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन मागणीचे निवेदन देऊन आपल्याकडून काम होत नाही. याचा तीव्र निषेध व रोश व्यक्त केला.

एक वर्षापासून माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे शिवनी येथील गट नंबर 662 येथे बेमुदत धरणे आंदोलन करत आहेत. पोलीस व आरोपी यांनी संगणमताने शेतातील घर शेड पाडले,अँगल कट केले, त्याची चोरी ही केली मात्र या प्रकरणी पिंपळनेर पोलिसांनी गुन्हा नोंद केला नाही, या सर्व घटनेचे पुरावे वाघमारे यांच्याकडे व्हिडिओ स्वरूपात आहेत पोलीस प्रशासन हे अपराध्यांना पाठीशी घालत आहे.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी पालकमंत्री तथा कृषीमंत्री याचे आज जिल्हाधिकारी उपोषणाला बसलेल्या लोकांची भेट घेत पुढे आले त्यावेळी भेट देते प्रसंगी खिशातील काळा झेंडा फडकवत निषेध केला. त्यांच्या सोबतच्या सुरक्षारक्षकांनी तो ताब्यात घेतला. यावेळी पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची चांगलीच पाच वर धारण बसली. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या बेमुदत धरणे आंदोलनाची चर्चा होत आहे.



# आर्यवैश्य महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी सूर्यकांत महाजन तर सचिवपदी अजय रुद्रवार



**केज/सचिन भालेराव**

महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी क्रियाशील व्यक्तिमत्वाचे सूर्यकांत महाजन यांची तर सचिवपदी अजय रुद्रवार यांची तर कार्याध्यक्षपदी वैभव झरकर व कोषाध्यक्षपदी बालाजी बासटवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली

बीड जिल्ह्याच्या विद्यमान कार्यकारिणीची कालावधी संपल्यामुळे मागील तीनवर्षांच्या ताळेबंदाला मान्यता देण्यासाठी सचिव वैभव झरकर यांनी बैठकीची सूचना काढली होती व याच बैठकीत नवीन कार्यकारिणीच्या निवड व्हावी याकरिता महासभेकडून समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्त समितीतील अभय कोकड , विकास डुबे व अनिल चिद्रवार , संजीवजी डुबे , नागनाथ पारसेवार , अजित भावठणकर यांनी त्यांना निवड प्रक्रियेसाठी मिळालेल्या प्राप्त निर्देशानुसार इच्छुकांचे अर्ज मागवले त्यानुसार निहित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरून माजलगाव येथे महासभेच्या सर्व जिल्हा सदस्यांची बैठक घेण्यात आली त्याठिकाणी प्राप्त अर्जंवर विचार व खुली चर्चा होऊन अनेकांनी आपले अर्ज वापस घेतल्याने प्रत्येक पदासाठी एकच अर्ज राहिला होता तसेच या बैठकीच्या अजेंड्यानुसार मावळते अध्यक्ष सुमित रुद्रवार , सचिव वैभव झरकर व कोषाध्यक्ष अभय भावठणकर यांनी तीन वर्षांचा ताळेबंदासह धारूर येथे झालेल्या कुटुंब मेळाव्याचा ताळेबंद सर्वांना सादर केला व त्यास सर्वसंमतीने मान्यता देण्यात आली

माजलगाव येथे सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर सोमवार दि 12 ऑगस्ट रोजी परळी येथे महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी बीड जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षपदी महासभेचे जेष्ठ सदस्य असलेले बीड येथील सूर्यकांत महाजन यांची तर सचिवपदी माजलगाव येथील प्रतिष्ठित सराफ व्यापारी अजय रुद्रवार यांची तर कार्याध्यक्षपदी माजी सचिव असलेले परळी येथील वैभव झरकर यांची तर कोषाध्यक्षपदी अंबाजोगाई येथील बालाजी बासटवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली उर्वरित कार्यकारिणीच्या निवडीसाठी नवनियुक्त कार्यकारिणीला जिल्ह्याचा दौरा करून लवकरात लवकर निवडी करण्याच्या सूचना यावेळी

देण्यात आल्या यावेळी महासभेचे सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

# स्वाभिमानी गुणगौरव व असर इंडिया प्रकल्पांतर्गत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम संपन्न....

**बीड।प्रतिनिधी**

दि.१५ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना ता.जी. बीड येथे दरवर्षीप्रमाणे स्वाभिमानी गुणगौरव व तसेच इंडिया प्रकल्प अंतर्गत बक्षीस वितरणाचा कार्यक्रम मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला...

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना ता जि बीड येथे दरवर्षीप्रमाणे याही वर्षी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके यांच्यातर्फे पहिली ते सातवी वर्गातील पहिला आणि दुसरा येणाऱ्या विद्यार्थ्यांना कंपास पेटीचे बक्षीस वितरण सौंदाना गावातील रहिवासी असलेले काही अधिकारी श्री विशाल शरदराव गायके उपशिक्षणाधिकारी श्री सचिन पांडुरंग कथले पीएसआय तसेच श्री वचिष्ठ पांडुरंग कथले (SRP) श्री मयूर सुंदर ढवळे व श्री सचिन बाळासाहेब घोलप तसेच स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष श्री राजू गायके या प्रतिष्ठित व्यक्तींच्या हस्ते



वितरण करण्यात आले. तसेच असर इंडिया प्रकल्पांतर्गत पर्यावरण सखी सौ पार्वती राजू गायके यांनीही शाळेमध्ये चित्रकलेची स्पर्धा घेण्यात आली. यावेळी चौथी ते सातवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांची चित्रकलेची परीक्षा घेतली आणि त्या विद्यार्थ्यांनाही बक्षीस देण्यात आले..

यावेळी सौंदाना गावातील सरपंच उपसरपंच व शालेय शिक्षण समितीच्या अध्यक्षा सौ शितल गायके तंटामुक्ती अध्यक्ष श्री कहानू महाराज गायके श्री शरदराव गायके श्री पांडुरंग कथले, गोरख गायके, सुधाकर कथले, सुंदर ढवळे, तसेच जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना येथील मुख्याध्यापक श्री मिसाळ सर श्री कागदे सर श्री साळवे सर श्री घोलप सर श्री शिंदे सर सौ बडे मॅडम सौ चव्हाण मॅडम सौ जाधव मॅडम व अंगणवाडी येथील कार्यकर्ती सौ सुरेखा शरद गायके सौ शोभा प्रदीप गायके तसेच गावातील आशा स्वयंसेविका पार्वती राजू गायके तसेच गावातील प्रतिष्ठित पुरुष महिला आणि विद्यार्थी उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना ताजी बीड व ग्रामस्थांच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सौंदाना येथे शिक्षण घेऊन अधिकारी झालेले चि. विशाल शरदराव गायके,उपशिक्षणाधिकारी. चि.सचिन पांडुरंग कथले, पीएसआय. तसेच चि.वचिष्ठ पांडुरंग कथले (SRP)चि. मयूर सुंदर ढवळे व चि.सचिन बाळासाहेब घोलप,कु. प्रतिक्षा बाळासाहेब गायके यांचाही थाटामाटात सत्कार करण्यात आला यावेळी गावातील प्रतिष्ठित व्यक्ती पुरुष-महिला आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते...

# माध्यमिक विद्यालय मारफळा येथे स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**टाकरवन।प्रतिनिधी**

माध्यमिक विद्यालय मारफळा या विद्यालयात दिनांक १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्ष शालेय समितीचे अध्यक्ष गुलाबराव कुटे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या कार्यक्रमाच्या निमित्ताने शालांत प्रमाणपत्र परीक्षा मार्च २०२४ मध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय, येणाऱ्या विद्यार्थ्यांचे गावातील याच शाळेचे माजी विद्यार्थी शिक्षणप्रेमी गोपीनाथराव कुटे, दिगांबर कुटे,



शाम गिरी यांनी रोख रक्कम व बक्षीस सन्मानचिन्ह हे पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.याप्रसंगी शिक्षण प्रेमी ग्रामपंचायत माजी सरपंच बाबासाहेब वैद्य, बाबुराव कुटे,कल्याण वायसे, बेग शब्बीर, अमोल चोपडे,बाळू गिरी, अंकुश राठोड, श्रीराम पवार, विठ्ठल चव्हाण व प्रतिष्ठित ग्रामस्थ व तरुण युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते शाळेचे मुख्याध्यापक श्री पवार यांनी इयत्ता ५ ते ७ विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाच्या पुस्तकाचे वितरण करण्यात आले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे जेष्ठ शिक्षक ठोंबरे सर व बाबर सर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच कला व विज्ञान महाविद्यालय प्राचार्य राजूरकर सर व त्यांचे सर्व सहकारी यांनी अथक परिश्रम घेतले. शाळेचे कनिष्ठ लिपिक बाबर यांना पदोन्नती वरिष्ठ लिपिक मिळाल्याबद्दल गावकऱ्यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला व या शाळेचे नवनियुक्त मुख्याध्यापक पवार यांचा सुद्धा गावकऱ्यांचे हस्ते सत्कार करण्यात आला कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ठोंबरे यांनी केले तर कार्यक्रमाचे आभार शेख सरांनी मांनले.



ठाणे : दिवा पोलीस चौकीचे सहायक पोलीस निरीक्षक अमोल कोळेकर व तोरडमल यांना स्वातंत्र्यदिनी दिवा समाजसेवक विकास इंगळे यांसकडून भारताचे संविधान सप्रेम भेट देण्यात आले. (फोटो - संतोष पडवळ )–

# पाटोद्याच्या अजिज मोबाईल शॉपी मार्फत प्रभात फेरीला पाणी व खाऊचे वाटप

**पाटोदा।प्रतिनिधी**



पाटोदा येथील अजीज मोबाईल शॉपी मार्फत स्वातंत्र्यदिनी शहरातून निघत असलेल्या प्रभात फेरी मधील मुलांना बिस्किट व बिसलेरी पाण्याची बाटली देण्याचा प्रतिवर्षाचा उपक्रम अजीज शॉपी चे मालक अजीज मकरानी यांनी याही वर्षी राबविला असल्याने मोबाईल शॉपी मालकाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे

पाटोदा येथील अजिज शॉपी चे मालक अजिज मकरांनी हे स्वातंत्र्य दिन व प्रजासत्ताक दिन प्रभात फेरी मधील मुलांना बिस्कीट पुडे व बिसलेरी पाण्याची बाटली वाटपाचा उपक्रम गेल्या अनेक वर्षापासून राबवीत आहे याही वर्षी स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधत अजीज मकरांनी यांनी प्रभात फेरीतील मुलांना बिसलेरी पाणी व बिस्कुट पुडे वाटून स्वातंत्र्य दिन साजरा केला जवळपास तीन ते साडेतीन हजार मुला मुलींना बिस्कीट पुडे व पाणी देण्यात आले . अजित मकरानीच्या या राबवित असलेल्या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहे

# प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा

**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा शहरातील प्रियदर्शनी प्राथमिक शाळेमध्ये स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव उपक्रमा अंतर्गत हरघर तिरंगा हा उपक्रम मोरे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक १३ ते १५ ऑगस्ट २०२४ या तीन दिवस ध्वजारोहण करून तसेच शाळेमध्ये तिरंगा रॅली, तिरंगा ध्वज चित्रकला ,विद्यार्थी वकृत्व स्पर्धा , विद्यार्थ्यांना पॅड वाटप, खाऊ वाटप अशा उत्साह पूर्ण उपक्रमांनी साजरा करण्यात आला यामध्ये दिनांक १३ या दिवशी मुख्याध्यापक मोरे सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले ध्वजारोहणानंतर तिरंगा ध्वज हातात घेऊन खेळ स्पर्धा घेण्यात आल्या



,त्याचबरोबर तिरंगा ध्वज चित्र काढून रंगवणे हा उपक्रम राबवण्यात आला, दिनांक १४ रोजी ध्वजारोहणानंतर पाटोदा शहरातून तिरंगा रॅली काढण्यात आली यामध्ये शाळेतील सर्व विद्यार्थी सहभागी झाले तसेच दिनांक १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनाच्या दिवशी शाळेत सकाळी ध्वजारोहण माननीय श्री नागरगोजे साहेब यांच्या हस्ते करण्यात आले तसेच यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अतुल रावजी घोलप ,नामदेव शिंदे हे उपस्थित होते तसेच माता-पालक चापकानडेताई, जोगदंडताई ,तांबे ताई ,वाघमारे ताई,गायके ताई ,राजपुरे ताई.यांची उपस्थिती होती आलेल्या सर्व प्रमुख पाहुण्यांचे स्वागत तिरंगा ध्वज देऊन करण्यात आले,सकाळी ध्वज ध्वजारोहणानंतर विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली.. प्रभात फेरीनंतर देशभक्तीपर विषयावर वकृत स्पर्धा घेण्यात आली यानंतर विद्यार्थ्यांना संस्थेचे प्रमुख माननीय डॉक्टर योगेश भैय्या क्षीरसागर यांच्या वतीने पॅड वाटप करण्यात आले.. यावेळी आलेल्या प्रमुख पाहुण्यांनी आपले विचार व्यक्त करताना भारतीय स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या महामानवांच्या जीवन चरित्राबद्दल विचार व्यक्त केले तसेच कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक मोरे सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना महामानवा चे चरित्र आत्मसात करावे याबाबत मार्गदर्शन केले यावेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री माताडे सर यांनी केले तर आभार श्रीमती शेलार मॅडम यांनी मानले शेवटी पॅड वाटपानंतर विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून या कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.


# कोट्यवधी रुपये खर्चून बांधलेल्या पाटोदा तहसिल कार्यालयात रॅम्प, लिफ्ट सुविधांचा अभाव

## जिल्हाधिका-यांचे कार्यवाहीचेआदेश

**पाटोदा।प्रतिनिधी**

दिव्यांगासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयात रॅम्प, लिफ्ट ची सुविधा असावी हा शासन नियम असतानाही कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या पाटोदा तहसिल कार्यालयाच्या इमारतीमध्ये दिव्यांगासाठी रॅम्प,लिफ्टची सुविधा नसल्याने मागील ७ वर्षांपासून दिव्यांगांना तिसऱ्या मजल्यावर ५४ पाय-या सरपटत चढुन कार्यालयात जावे लागते. एवढेच नव्हे तर संबंधित प्रकरणी दिव्यांग आयुक्तांच्या सुचनेकडे तहसिल प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचे दिसून येत आहे.त्यामुळे दिव्यांगांना यातना सहन कराव्या लागत आहे कोट्यवधी रुपये खर्चून बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या अंदाज पत्रकाची वरीष्ठ स्तरावरून सखोल चौकशी करून संबधित अधिकारी, कंत्राटदार यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्यात यावी तसेच दिव्यांग आयुक्तांच्या सुचनांचे पालन न करणा-या तहसीलदार यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी. नसता 15 ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर गणेश ढवळे यांनी उपोषण करण्याचा इशारा दिला असता याची गांभीर्याने जिल्हाधिकारी यांनी दखल घेऊन याची चौकशी करण्याचे आदेश देऊन दोशीवर कारवाई करण्याचं आदेश दिले आहे

पाटोदा तहसीलदारांचे कक्ष इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर आहे.त्यांची स्वाक्षरी अथवा निवेदन देण्यासाठी तिसरे मजल्यावर जाताना दिव्यांगांना ५४ पाय-या चढताना असह्य वेदना सहन कराव्या लागत आहे तसेच दिव्यांग बांधव चढताना खाली पडुन अपघात होण्याची शक्यता आहे त्यामुळे संजय गांधी कार्यालय कायमस्वरूपी तळमजल्यावर घ्यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड दिव्यांग आयुक्त कार्यालय यांना केली आहे. अपर जिल्हादंडाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी उपविभागीय अधिकारी पाटोदा आणि तहसीलदार पाटोदा यांना निवेदनातील मुद्यांबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करावी.केलेल्या कार्यवाही बाबत संबंधित अर्जदार यांना अवगत करावे असे लेखी निर्देश दिले आहेत. प्रशासकीय इमारतीच्या बांधकामाच्या संपूर्ण अंदाजपत्रकाची व जबाबदार यंत्रणेची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी असेही आदेश देण्यात आले पाटोदा तहसिल कार्यालयाची निजामकालीन इमारत पाडून तहसिल कार्यालय व उपविभागीय कार्यालयासाठी कोट्यवधी रुपयांच्या निधीचा चुराडा करून ईमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. शासकीय इमारतीच्या बांधकामाचे अंदाज पत्रक तयार करताना इमारत क्षेत्रात दिव्यांगासाठी रॅम्प, लिफ्ट आदि सुविधांचा कोणताही विचार कंत्राटदार,आधिका-यांनी केलेला दिसत नाही.त्यामुळे इमारत बांधकामाच्या संपूर्ण अंदाजपत्रकाची व जबाबदार यंत्रणेची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे. विशेष म्हणजे दिव्यांग आयुक्तांच्या सुचनेकडे तहसीलदार यांचे दुर्लक्ष केले




-पाटोदा तहसिल कार्यालयात रॅम्प, लिफ्ट नसल्याने दिव्यांगांची हेळसांड होत असल्याने उपाययोजना करण्यात यावी अशा लेखी तक्रारीनंतर प्रवीण पुरी ( भा.प्र.से.) सक्षम न्यायाधिकारी तथा आयुक्त दिव्यांग आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांनी संबंधित प्रकरणी चौकशी करून कार्यवाही करण्यात यावी अशा सुचना तहसीलदार पाटोदा यांना दिलेल्या आहेत.मात्र सुचनांकडे दुर्लक्ष करून अद्याप कोणतीही उपाययोजना करण्यात आलेली नाही.त्यामुळे संबंधित प्रकरणात तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश तहसीलदार पाटोदा यांना देण्यात येऊन संवेदनशील प्रकरणात गांभीर्य न दाखवल्याने व आयुक्तांच्या सुचनेकडे दुर्लक्ष केल्याबद्दल आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

अपर जिल्हादंडाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांचे उपविभागीय अधिकारी व तहसीलदार पाटोदा यांना कार्यवाहीचे आदेश दिले आहेत पाटोदा तहसिल कार्यालयात दिव्यांगासाठी अडथळा विरहित ( रॅम्प, लिफ्ट) आदि सुविधा दिव्यांग नसल्याने दिव्यांगांची हेळसांड होत असुन संबंधित प्रकरणी दिव्यांग आयुक्तांच्या सुचनेकडे दुर्लक्ष केल्याबद्दल तहसीलदार यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी तसेच कोट्यवधींचा खर्च करून बांधण्यात आलेल्या ईमारत बांधकामाच्या संपूर्ण अंदाजपत्रकाची सखोल चौकशी करून जबाबदार कंत्राटदार,आधिका-यांवर कारवाई करण्यात यावी अशी लेखी तक्रार डॉ.गणेश ढवळे यांनी केल्यानंतर त्या निवेदनाच्या अनुषंगाने निवेदनातील नमुद मुद्यांबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करण्याचे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी बीड शिवकुमार स्वामी यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार पाटोदा यांना दिले आहेत.

# चकलंबा पोलिस ठाण्यात पोलिसांकडून पत्रकारास मारहाण

## पोलिस निरीक्षक एकशिंगे साहेब तुम्ही गुन्हा नोंद न करता तुमच्या कर्मचाऱ्यांरी पाठराखण करण योग्य आहे का





## चकलंबा पोलिस म्हणजे हम करे सो कायदा

पोलिस निरीक्षक एकशिंगे साहेब तुम्ही ठाण्यात असतांना देखिल गुन्हा का नोंद केला नाही.? पत्रकार असलम कादरी व शोहेब कादरी यांना मारहाण झाल्यानंतर ते पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यासाठी आले त्या दरम्यान देखील अनंता तांगडे यानी त्या दोघांना मारहाण केली . हेदोघेएकशिंगेसाहेब आमचीफिर्यादघ्या असेसांगत होतेतुम्ही त्यांचीफिर्यादका घेतली नाही? एस.पी.---साहेब आपण आनंता तांगडे वर आपण कारवाई करणार का?

**चकलांबा।प्रतिनिधी**
गेवराई तालुक्यातील चकलंबा पोलिसा कडून पत्रकारास मारहाण झाल्याची घटना दि.१५ऑगस्ट २०२४ गुरूवार रोजी सायंकाळी १० वाजण्याच्या सुमारास घडली आहे.या घटनेची अधिक माहिती अशी की, चकलंबा पोलिस ठाण्या समोर पत्रकार आस्लम कादरी व त्यांच्या भाऊ शोहेब कादरी (रा.चकलंबा) हे त्यांच्या स्वत:दुकानासमोर उभे असतांना त्या दोघांनाही पाहुन येथील पि एस आय आनंता तागंडे यांनी पोलिस ठाण्यातून येऊन त्या दोघां भावांना बेदम मारहाण सुरू केली मारहाण करत असतांना पत्रकार असलम कादरी याला पि.एस.आय. आनंता तांगडे म्हणत होते की,तू खूप मोठा पत्रकार झालाय का मी धरलेल्या वाळूच्या गाड्या जवळ येऊन विडियो काढून मला विचार पूस करतोस आम्ही काय येथे फुकट आलोय का आम्ही पण येथे नोटा मोजून आलोय आणि त्या नोटा का तुझ्या बाप देणार का असे म्हणत पत्रकार आसलम कादरी व शोहेब कादरी यांना मारहाण करण्यात आली. हे बीड जिल्हयातील चकलंबा पोलिस ठाणे कायम वादाच्या भोवऱ्यात असतं बीड जिल्ह्यातील सर्वाधिक अवैध धंदे या पोलिस ठाण्याच्या हद्दीत चालु आहेत.अवैध वाळू उपसा,मटका,अवैध पत्ते, एक ना अनेक अवैध धंदे या पोलिस ठाण्याच्या हद्दीत सुरू असुन पोलिस या धंद्याकडे आर्थिक देवाण घेवाणीतुन जाणिवपूर्वक दुर्लक्ष करतात असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही.कारण या पोलिस ठाण्याच्या हद्दीत अवैध धंदे जोरात सुरू आहेत आणि पोलिस या कडे लक्ष देत नाहीत आज जो प्रकार चकलंबा पोलिस ठाण्यात घडला तो पाहता पोलिस हे फक्त पत्रकार व सर्व सामान्य माणसाला दबाव टाकण्या साठी आहेत का असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. कारण पि.एस.आय. आनंता तागंडे याने पत्रकार असलम कादरी याला पोलीस ठाण्यसमोर मारले.आणि नंतर पत्रकार असलम कादरी यांनी त्या पोलिस कर्मचारी तागंडे याच्या विरोधात गुन्हा नोंद करण्यासाठी जात असताना देखील त्यांना मारहाण केली एकीकडे चकलंबा पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात चोऱ्या होत आहेत तर त्या चोरट्यांना पकडायचे सोडून तुम्ही सर्व सामान्य माणसाला मारहाण करत आहेत वा रे वा आनंता तागंडे ,हे पोलीस ठाणे म्हणजे, हम करे तो कायदा असं नसतं . .

## समाजसेवा झाली मिळकत ची नौकरी

ढाणकी प्रतिनिधी : अशोक गायकवाड आता विधानसभेची गंगा वाहू लागली आहे. यात सगळे डुबकी लावून आपले भाग्य उज्वळण्याच्या तयारीत आहे. पण जनतेची गंगा सगळ्या पापी आणि पुण्यवान भक्तांना ओळखून आहे. साजसेवाच्या नावाखाली पैसा कामावणाच्या नादात विधानसभा लक्षात ठेऊन कोणी आंदोलन करत आहे तर कोणी उपोषण ला बसत आहे. समाज सेवेच्या नावाखाली आपले बँक बॅलन्स वाढविण्यासाठी आपल्या धंद्यात मनमर्जी मनाने माया पुंजी कमवून सुद्धा समाधान न राहिलेले पदाधिकारी, डॉक्टर आणि प्राध्यापक विधानसभा मध्ये उडी घेण्याच्या तयारीत आहे. पण उमरखेड महागाव मतदार संघातील जनता आता अश्या भोंदू समाजसेवक ला धडा शिकवण्यासाठी सज्ज तयारी करून आहे. जर अश्या भोंदू समाजसेवकाला पार्टी तिकीट देत असेल तर याची विकेट जनता पाडणार असून विधानसभा मध्ये यावर बाजी लावणारे पक्ष शंभर टक्के बाजी हरणार आहे. कारण जनता अश्या भोंदू समाजसेवकाला ओळखून आहे.



उमरखेड महागाव मतदार संघात मागील कित्येक वर्षा पासून रस्ते, पाणी, आरोग्य, रोजगार आणि मूलभूत सुविधा ची समस्या असून गावागातील व बंदी भागाचे प्रश्न अदयाप कोणी निकाली लावला नाही. निवडणूक च्या तोंडा पुरते जेव्हा तहान लागेल विहीर खोदणारे भोंदू समाजसेवक पावसाळ्याच्या ऋतू मध्ये बेंडक्या सारखे बाहेर निगणारे भोंदू समाजसेवक निवडणुकीच्या वेळी बाहेर निगणाऱ्या उमेदवाराला निवडून न देण्याचा जनतेने चंग बांधला आहे.

## इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेत सनराइज क्लासेस चा शोएब आतार प्रथम

**शिरूर कासार । प्रतिनीधी**
महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद तर्फे घेण्यात आलेल्या पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जुलैमध्ये घोषित करण्यात आला .इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये शिरूर कासार येथील नामांकित सनराईज् कोचिंग क्लासेस चा विद्यार्थी शोएब शौकत आतार याने उज्वल यश प्राप्त करून तो स्कॉलरशिप साठी पात्र ठरला आहे .शोएब आतार याने कालिकादेवी माध्यमिक विद्यालयातून एकट्यानेच हे यश मिळविले असून शिरूर कासार मध्ये इयत्ता आठवी स्कॉलरशिप परीक्षेत शोएब आतार प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे .त्याने ३०० पैकी १९४ गुण मिळविले आहे. सनराईज



क्लासेस ने नेहमीच उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. एन एम एम एस परीक्षेमध्ये सुद्धा १७८ पैकी त्याने १२० गुण मिळविले आहेत. सनराईज् क्लासेसच्या प्रिंटेड नोट्स व नियमित मार्गदर्शनाचा त्याला फायदा झाला आहे तसेच संपूर्ण वर्षभर दर रविवारी घेण्यात येणाऱ्या संडे टेस्ट तसेच वेगवेगळ्या दहा प्रकाशन यांच्या सराव प्रश्नपत्रिका सोडविल्यामुळे दोन्ही परीक्षेत यश मिळविणे सोपे गेले असल्याची भावना शोएबने व्यक्त केली आहे. शिरूर कासार तालुक्यातील सनराईज कोचिंग क्लासेस ने यापूर्वीही अनेक यशस्वी विद्यार्थी घडवून दर्जेदार मार्गदर्शन व उत्कृष्ट गुणवत्ता वेळोवेळी सिद्ध केली आहे.

## सिरसदेवी परिसरात चोरांचा सुळसुळाट, दोन दिवस झाले चोरांचा अडागळे वस्तीवर वॉच

**गेवराई/प्रतिनिधी**
गेवराई तालुक्यातील सिरसदेवी गावात गेल्या दोन दिवसा पासून सिरसदेवी फाटा पासून जवळच असलेल्या अडागळे वस्तीवर चोरांनी सुळसुळाट लावला आहे हे चोर रात्रीच्या ८ ते १० वाजण्याच्या सुमारास वस्तीवर दगडफेक करून वस्तीवरील नागरिकांना त्रास देऊन पळ काडत असल्याचे माहिती आहे. तसेच अडागळे वस्तीवर दगडफेक करून सिरसदेवी गावात हे चोर धुमाकूळ घालत आहेत यामुळे सिरसदेवी परिसरातील नागरिका मध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. यामुळे पोलीस प्रशासनाणे या चोरांचा वेळीच बंदोबस्त लावण्याची मागणी परिसरातील नागरिकांमधून होत आहे. तसेच आज दि.१५/०८/२०२४ रोजी अडागळे वस्तीवर ८ वाजनेच्या सुमारास काही अज्ञात चोरांनी ठराविक घरावर दगडफेक करून पळ काढला परंतु काही युवकांनी त्या चोरट्याना पाळताना बघितल्यावर त्यांच्या माघे वस्तीवरील युवकानी पाठलाग केला परंतु चोरट्यानी धूम ठोकल्याने चोरटे पकडण्यात यश आले नाही त्यामुळे वस्ती वरील काही युवकांनी तलावडा पोलिसांना या घटनेविषयी माहिती फोनवर दिली असता घटनास्थळी तात्काळ तलवाडा पोलीस दाखल झाली व या घटनेविषयी माहिती घेऊन अडागळे वस्तीवरील नागरिकांना सतर्क राहण्याचे आव्हान केले तसेच काही अडचण आल्यास आम्हाला फोन करा सांगितले. तसेच यावेळी अडागळे वस्तीवरील नागरिकांनी व युवकानी तलवाडा पोलिसांना विनंती केली कि गेली दोन दिवस झाले हे चोरटे वस्तीवर येऊन घरावर दगडफेक करून पळून जातात त्यामुळे वस्तीवरील महिला, लहान मुले भयभीत झाले आहेत त्यामुळे आपण अडागळे वस्तीवर पोलीस संरक्षण देण्यात यावे अशी मागणी तलवाडा पोलिसांना केली असता या मागणी विषयी तलवाडा पोलिसांनी वसतिवारील नागरिकांना समाधानकारक उत्तर दिले कि आम्ही आपल्या वस्तीवर वेळोवेळी आम्ही पेट्रोलिंग करू तसेच काही अडचण आल्यावर आम्हाला फोन करा तसेच चोर दिसल्यास त्याचा पाठलाग करून त्याला पकडून आमच्या ताब्यात द्यावे असे बोलून तलवाडा पोलीस अडागळे वस्तीवरुन निघून गेले. जर आज रात्री किंवा उद्या रात्री अनुचित प्रकार अडागळे वस्तीवर चोराकडून घडला तर याला जीमेदार कोण? असा प्रश्न सिरसदेवी परिसरातील नागरिक व युवकामधून उपस्थित होत आहे.तसेच तलवाडा पोलिसांनी चोरांचा बंदोबस्त लवकरात लवकर करावा अशी मागणी नागरिक करत आहेत.



मुंबईत ग्राहक सहकार क्षेत्रात अग्रेसर असलेल्या विक्रोळीतील कन्नमवार नगर नंबर २ ग्राहक सहकारी भांडार च्या वतीने १५ ऑगस्ट रोजी ध्वजारोहण प्रमुख पाहुणे ज्येष्ठ पत्रकार सन्मा. नासिकेत पानसरे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. याप्रसंगी सहकार भांडारचे सचिव श्री.अरुण रावले, खजिनदार व ज्येष्ठ वृत्तपत्रलेखक कृष्णा काजरोळकर, संचालक वसंत तावडे, संचालिका सौ. वैशाली कदम, समाजसेवक वासुदेव कदम, यशवंत रेवाळे आदि मान्यवर उपस्थित होते

## गांजेगाव नदीवर रेतीच्या गाड्या भरुन देऊन आनंद घेणारा कोण ?

### सकाळी ३ वाजता पासून वही पेन घेऊन नोंदणी करून पठाणी वसुली ढाणकी गांजेगाव पुलावरील घटना महसूल विभागाच्या डोळ्यात धुळफेक.

उमरखेड/ प्रतिनिधी :
सध्या पावसाळ्याचे दिवस असूनही ढाणकी शहरात दररोज हजारो टन रेती ही गांजेगाव नदीवरून येत आहे. जवळपास ४० गाड्या दररोज नदीवरून रेती भरून शहरात येतात. या ४० गाड्यांची पूर्ण नोंदणी व पठाणी वसुली सकाळी ३ वाजेपासून नदीवर जाऊन, वहीवर पेनाने नोंदणी करणारा आणि यावरची मलई खाऊन स्वतः आनंद घेणारा तो कोण ? असा प्रश्न निर्माण होत आहे. दिवसाढवळ्या महसूल विभागाच्या डोळ्यात स्पष्टपणे धुळफेक करणारा तो महसूल विभागाचा कर्मचारी तर नाही ना ? असेल तर संबंधित तलाठ्याचे त्याला समर्थन तर नाही ना ? कुठल्याही रॉयल्टी विना अवैध रेती तस्करीचा ढाणकी शहरात जोर वाढला आहे. अशी जनतेत चर्चा आहे. सकाळी ३ वाजता पासून गांजेगाव नदीवर, वहीवर अवैध रेती तस्करांच्या गाड्यांची नोंदणी करून, पठाणी वसुली करणाऱ्याचा शोध महसूल विभाग गांभीर्याने घेणार का ? पठाणी वसुली करणारा जर महसूलचाच कर्मचारी निघाला तर, त्यावर कायदेशीर कारवाई करणार का ? मंडळ अधिकारी सुरोशे



साहेबांच्या कार्यक्षेत्रात, सद्यस्थितीत अवैध रेती तस्करी करणाऱ्यावर जसा मंडळ अधिकारी सुरोशे यांनी लगाम कसला तसाच, गांजेगाव येथील अवैध रेती तस्करीवर संबंधित मंडळ अधिकारी लगाम कसणार का ? असे वेगवेगळे प्रश्न सध्या नागरिकांना पडले आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077